# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577 Website: www.jdroamt.org
Email: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२६/ 1116
दिनांक :- 29 APR 2026

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१३ (POSH Act) ची प्रभावी अंमलबजावणी करुन अद्ययावत संकलित माहिती Improved Version of She Box Portal वर upload करुन Update करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक DTEM-D१६/३६/२०२६-DESK१६ दिनांक २४/४/२०२६.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाकडून SHE BOX पोर्टलवर नोंदणी करण्याबाबत यापूर्वीच आपल्याला कळविण्यात आलेले आहे. परंतु तरी देखिल याबाबत असे निदर्शनास आले आहे की, अद्याप काही संस्थांनी माहितीची नोंद संबंधीत वेबसाईटवर करण्यात आलेली नाही.

तसेच दिनांक २४/३/२०२६ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये महिला व बाल विकास कार्यालय यांचे कडून संचालनालयाच्या नोडल अधिकारी यांना सदर प्रकरणी विचारणा करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

१) १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व सरकारी व खाजगी आस्थापनांमध्ये १००% अंतर्गत समित्या स्थापन करुन त्याची नोंद SHE Box Portal वर करण्यात यावी.

२) अंतर्गत समितीचे फलक ठळकपणे दिसतील अशा दर्शनी भागात लावण्यात यावेत.

३) शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत समिती स्थापन झालेल्या समितीच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

४) शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये POSH Act-२०१३ अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये प्रचार, प्रसिध्दी व [illegible] कार्यक्रम घेण्यात यावेत व त्याची नोंद SHE Box Portal वर करण्यात यावी.

वरील प्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दिनांक ०५/०५/२०२६ पर्यंत सादर करण्यात यावा. या प्रकरणी निर्देशांप्रमाणे नोंदणी न केल्यास, समिती स्थापन करण्याच्या कामी विलंब केल्यास भविष्यात काही दंडात्मक कार्यवाही झाल्यास संस्था प्रमुख म्हणून आपली सर्वस्वी जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**सहपत्र :-** वरिल प्रमाणे.